## नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०४/२००५ मधील नि.क्र.८३ वरील आदेश

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतीचा कब्जा मिळणेसाठी, दरम्यानचे उत्पन्न आणि नुकसानभरपाईपोटी रक्कम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१अ ते १ड आणि प्रतिवादी क्र.२अ२ व २अ३ यांनी वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ चा त्यांचेतर्फे उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्दबातल होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जातील सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, प्रस्तुत प्रतिवादी हे महत्त्वाच्या व तातडीच्या कामानिमित्त बाहेरगांवी गेल्याने, तसेच त्यांनी वेळीच येवून आपल्या विधिज्ञांना वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ याचा उलटतपास घेण्याबाबत माहिती न दिल्याने साक्षीदाराचा उलटतपास त्यांना करता आला नाही. त्यामुळे सदर प्रतिवादींविरुध्द वरीलप्रमाणे आदेश पारीत झालेला आहे. प्रस्तुत प्रतिवादींना वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ याचा उलटतपास घेण्याची संधी न मिळाल्यास त्यांना मिळणा—या न्यायास मुकावे लागणार आहे. अर्ज नामंजुर झाल्यास प्रस्तुत प्रतिवादींना शारीरिक व मानसिक त्रासास सामोरे जावे लागणार आहे. सबब, प्रतिवादींविरुध्द वर नमुद झालेला आदेश रद्दबातल करणेत यावा व वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ याचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात यावी. इत्यादी सर्व बाबी नमुद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रस्तुत प्रतिवादींनी केली आहे.

०३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. वादीचे प्रस्तुत अर्जावर थोडक्यात असे म्हणणे आहे की, प्रस्तुत प्रतिवादींनी याकामी वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याकरीता बरेचदा संधी घेतलेली आहे. वादीने पुरावा संपल्याची पुरशीस दाखल केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दिलेला असल्याने तो नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमुद करुन वादीने अर्ज फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

०४.　　उभय पक्षकारांतर्फे संपूर्ण युक्तिवाद ऐकला. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता; दि.१८.११.२०१५ रोजी वादीतर्फे साक्षीदार क्र.०१ श्री. रमाकांत रामकृष्ण मसुरकर याच्या सरतपासाचे शपथपत्र नि.७२ वर सादर करण्यात आलेले आहे. प्रतिवादींतर्फे सदर साक्षीदाराची उलटतपासणी न घेण्यात आल्याने, दि.११.०१.२०१६ रोजी सर्व प्रतिवादींविरुध्द वर नमूद साक्षीदाराचा उलटतपास नाही असा आदेश निर्गमित करण्यात आला असल्याचे दिसून येते.

०५.　　अर्जातील नमूद कारणे पाहता, मुख्यत्वे वर नमूद साक्षीदारासंबंधी आवश्यक ती माहिती प्रस्तुत प्रतिवादींना वेळीच त्यांच्या विधिज्ञांना देता न आल्याने साक्षीदाराचा उलटतपास घेणे शक्य झाले नाही असे त्यांनी नमूद केलेले आहे. तथापि, कोणत्या माहितीअभावी प्रस्तुत प्रतिवादी हे वर नमूद साक्षीदाराचा उलटतपास वेळेत घेवू शकले नाहीत याबाबतचे सविस्तर विश्लेषण त्यांनी अर्जामध्ये दिलेले नाही. यावरुनच प्रस्तुतचा अर्ज मोघमपणे व असंदिग्धपणे दिलेला असल्याचे स्पष्ट होते. असे असले, तरीदेखील वादपत्रातील मागणी ही वादग्रस्त मिळकतींचा कब्जा मिळणेसाठी, दरम्यानचे उत्पन्न व नुकसानभरपाई पोटी रक्कम मिळणेसाठी असलेने, न्यायाच्या दृष्टीकोनातुन प्रस्तुत प्रतिवादींना वादीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी देणे उचित होणार आहे. तशी संधी देणे नाकारल्यास, त्यांना त्यांच्या न्याय्य हक्कास मुकावे लागणार असल्याची दाट शक्यता आहे. तथापि, सदर प्रतिवादींनी अर्ज दाखल करण्यास जो काही विलंब केलेला आहे, ते पाहता, त्यांच्यावर र.रु. २००/— खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे उचित राहील. खर्चाची रक्कम वादीस देणेचा आदेश निर्गमित करणे न्यायोचित ठरेल. करीता, खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज प्रतिवादी क्र.१अ ते १ड आणि प्रतिवादी क्र.२अ२ व २अ३ यांचेवर र.रु.२००/— इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. नि.७२ वरील दि.११.०१.२०१६ रोजी प्रस्तुत प्रतिवादींतर्फे वादीचा साक्षीदार क्र.०१ रमाकांत रामकृष्ण मसुरकर याचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येतो.

३. खर्चाची रक्कम पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी वादीस अदा करण्यात यावी. तसे न झाल्यास, प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

सही/—

(आर्. आर्. काळे.)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
सावंतवाडी.

स्थळ : सावंतवाडी.
दिनांक : २३ जून, २०१६.